Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2507S01V13P012

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research July'25
Issue–VII(I), Volume–XIII

# अमरावती शहराच्या संरचनात्मक विकासात लोकसंख्याशास्त्रीय गुणवैशिष्ट्यांची भूमिका

**श्री प्रशांत कांबळे**

संशोधक विद्यार्थी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ.

Email : - prasuvenu@ gmail.com mobile.No.9156745905

**Abstract (सारांश) :-**

अमरावती शहराच्या संरचनात्मक विकासात लोकसंख्या शास्त्रीय गुणवैशिष्ट्यांची भूमिका ही फार महत्त्वाची आहे. कारण कोणत्याही शहराच्या निर्मितीसाठी भूप्रदेश, लोकसंख्या व शासन या तीन घटकाची आवश्यकता असते. यादृष्टीने शहरातील कार्यशील लोकसंख्या तसेच साधनसंपत्ती महत्त्वाची असते. कोणत्याही शहराच्या संरचनात्मक विकासामध्ये त्या शहराची लोकसंख्या शास्त्रीय गुणवैशिष्ट्ये फार महत्त्वाची भूमिका बजावत असते. या संशोधनामध्ये अमरावती शहराच्या संरचनात्मक विकासात लोकसंख्या शास्त्रीय गुणवैशिष्ट्यांची भूमिकेचे विश्लेषण करण्यात आले आहे.

**Keywords :** अधिवेशन - संमेलन, भिन्नता - विविधता, तज्ञ - विद्वान, अभिक्षेत्र - संबंधित क्षेत्र, कालिक - काळानुसार.

## प्रस्तावना

कोणत्याही देशाच्या किंवा प्रदेशाच्या सर्वांगिण विकासात तेथील लोकसंख्येची भूमिका महत्त्वाची ठरते. मानवाने स्वतःची बुद्धीमत्ता, उपलब्ध तंत्रज्ञान व साधनसंपत्तीचा वापर करून पृथ्वीच्या पृष्ठभागावर निर्माण केलेल्या सांस्कृतिक पर्यावरणाची विकासातील भूमिका अधोरेखित करण्यासाठी तेथील लोकसंख्येच्या गुणवैशिष्ट्याचे अध्ययन करणे क्रमप्राप्त ठरते. लोकसंख्येची गुणवैशिष्ट्ये स्थळ व काळानुसार बदलतांना आढळतात. लोकसंख्येच्या गुणवैशिष्ट्यांत होणारा बदल लोकसंख्या भूगोलाच्या अध्ययन सामुग्रीस गतिमानता प्रदान करतो. ही गतिमानता भौगोलिक घटकांच्या परिणामातून प्रदर्षित झालेली दिसून येते.

पृथ्वीच्या पृष्ठभागावर आढळणारी भौगोलिक घटकातील विविधता, लोकसंख्या शास्त्रीय घटकांची गुणवत्ता व विविधता नियंत्रीत करते. परिणामी विविध भौगोलिक पर्यावरणात वसाहत करून राहणाऱ्या मानवाने तेथील भौगोलिक पर्यावरणाशी समायोजन करून निर्माण केलेल्या सांस्कृतिक विश्वातही बरीच विविधता आणि तफावत आढळते. कधी काळी फक्त भौगोलिक घटकांच्या विश्लेषणांशी संबंधित असणाऱ्या भूगोल विषयास अलेक्झांडर-वॉन-हंबोल्ट, कार्ल रिटर, फ्रेडरीक रॅटझेल इत्यादी भूगोल तज्ज्ञांच्या योगदानामुळे भौगोलिक अध्ययनात मानवाशी संबंधित आणि मानवनिर्मित घटकांनाही महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. उपरोक्त तज्ज्ञांच्या योगदानामुळेच भूगोलाची एक महत्त्वपूर्ण शाखा म्हणून प्राकृतिक भूगोलासोबतच मानवी भूगोलाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. काळाच्या ओघात मानवी भूगोलाचीही अनेक शाखा उपशाखांमध्ये विभागणी झालेली दिसून येते.

लोकसंख्या भूगोल ही मानवी भूगोलाची एक महत्त्वपूर्ण उपशाखा असून अमेरिकन भूगोल तज्ज्ञांच्या अधिवेशनात अध्यक्षीय भाषण करतांना जी. टी. त्रिवार्था यांनी सर्वप्रथम'लोकसंख्या भूगोल' या मानवी भूगोलाच्या

स्वतंत्र उपशाखेचा विस्तृतपणे उहापोह केला. दुसऱ्या महायुद्धानंतर विकसित झालेली ही ज्ञानशाखा अत्यंत झपाट्याने विस्तारीत झालेली दिसून येते. लोकसंख्या-शास्त्रीय गुणवैशिष्ट्याचे स्वरूप गतिशील असल्याने ते लोकसंख्या भूगोल या विषयाच्या अभ्यास सामुग्रीलाही गतिशीलता प्रदान करते.

**लोकसंख्या भूगोलाची व्याख्या :-**

लोकसंख्या भूगोलाची अभ्यास सामुग्री समजून घेण्याच्या दृष्टीने काही भूगोल तज्ज्ञांनी लोकसंख्या भूगोलाची केलेली व्याख्या अभ्यासणे महत्त्वाचे ठरते. काही महत्त्वाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे-

१. **जी. टी. त्रिवार्था** (१९५३) यांच्या मतानुसार, "प्रादेशिक भिन्नतेनुसार मानव जातीमधील वेगळेपणा समजून घेणे म्हणजेच लोकसंख्या भूगोल होय."

२. **एडवर्ड ॲकरमन** (१९५९) या अमेरिकन भूगोल तज्ज्ञानुसार "लोकसंख्या भूगोल म्हणजे लोकांच्या प्रगतीसाठी प्रदेशातील लोकांची भिन्नता, वितरण, वर्गीकरण आणि प्रकार इत्यादींची प्रदेशानुसार माहिती समजून घेणे म्हणजेच लोकसंख्या भूगोल होय."

३. **ब्रिटिश भूवैज्ञानिक जे. आय. क्लार्क** (१९६५) यांच्या मतानुसार "लोकसंख्या भूगोल म्हणजे लोकसंख्येचे वितरण, लोकसंख्येची संरचना, स्थलांतर आणि लोकसंख्येची वाढ यांच्या नैसर्गिक विविधतेशी असणाऱ्या संबंधाचा अभ्यास होय."

४. **विलंबर झेलन्स्की** (१९६६) यांच्या मते, "पृथ्वीवरील विविधतापूर्ण घटकांचा मानवी क्रियांवरती वेगवेगळ्या ठिकाणी वेळेप्रमाणे वेगवेगळा परिणाम दिसून येतो. तसेच येथे होणारे परिणाम मानव आणि भौगोलिक विविधता या दोहोवरती एकमेकामुळे झालेले असतात."

वरील व्याख्यांवरून असे निदर्शनास येते की, लोकसंख्या भूगोल म्हणजे लोकसंख्या, लोकसंख्येची वैशिष्ट्ये, लोकसंख्येचे अभिक्षेत्रीय व कालिक विश्लेषण यांचे अध्ययन होय.

**अध्ययनाचे उद्दिष्ट.**

१ - अमरावती शहराची ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमी अभ्यासणे

२ अमरावती शहरातील लोकसंख्येचे काळानुसार बदललेले वितरण अभ्यासणे.

३ अमरावती शहरातील लोकसंख्या घनता अभ्यासणे.

४ अमरावती शहरातील लोकसंख्येच्या गुणवैशिष्ट्यांचा अभ्यास करणे.

५ अमरावती शहरातील लोकसंख्येची वाढ अभ्यासून भविष्यात होणारे बदल स्पष्ट करणे.

६ अमरावती शहरातील लोकसंख्येची वयोरचना ,लिंगरचना व साक्षरता अभ्यासणे.

७ अमरावती शहरातील लोकांची व्यवसाय रचना ,धार्मिक संरचना अभ्यासणे.

८ अमरावती शहरातील औद्योगिक विकास अभ्यासणे.

९ अमरावती शहरातील विकासात्मक वाटचालीत येणारे अडथळे अभ्यासून योग्य निष्कर्ष लावून अमरावतीला विकासाच्या पातळीवर पोहोचविण्यासाठी योग्य उपाय योजना सुचविणे.

**गृहीतकृत्य**

लोकसंख्याशास्त्रीय गुणवैशिष्ट्यांची व्यापकता, गुणवत्ता व उपलब्धता कोणत्याही देशातील प्रदेशातील किंवा एखाद्या स्थळाच्या सर्वांगीण विकासाची दशा व दिशा निर्धारित करतात. विकासाच्या गतीमध्ये होणारा धनात्मक आणि ऋणात्मक बदल हा लोकसंख्या गुणवत्ता सापेक्ष असतो.

**साहित्य पूर्वावलोकन :-**

मानवी संसाधन हे कोणत्याही राष्ट्राला वा क्षेत्राला विकासात्मक उंचीवर घेऊन जाण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. मानवी संसाधनांची भूमिका जागतिक पातळीवर अनेक संशोधकांसाठी एक महत्त्वपूर्ण संशोधन विषय ठरला आहे. त्यामुळे या विषयावर अनेक तज्ज्ञांनी संशोधन केले आहे. त्यापैकी काही तज्ज्ञांच्या संशोधन विषयाचा आढावा येथे घेण्यात आलेला आहे.

१. **Bidvai, B. K.** (१९५१) यांनी "The variation of Population in Amravati District" या लेखात अमरावती जिल्ह्यातील लोकसंख्या बदलाचा अभ्यास केलेला आहे.

२. **Sinha, B. K.** (१९५८) यांनी "Population Analysis of Orisa" या संशोधन पेपरमध्ये ओरीसा राज्यातील लोकसंख्येचे विश्लेषण केलेले आहे.

३. **Shastri, P. S.** (१९७३) यांनी "Growth and Distribution of Population in Nagpur City" या विषयावर शोधनिबंध प्रस्तुत करून नागपूर शहराचे अध्ययन केले आहे. हे अध्ययन पूर्णतः दुय्यम स्वरूपाच्या सांख्यिकीय स्त्रोतावर अवलंबून आहे. त्यांनी १९५१ ते १९७१ या काळातील नागपूर शहराची वार्डनिहाय लोकसंख्या वाढ, लोकसंख्येचे वितरण, घनता, व्यवसाय, संरचना, धार्मिक संरचना, लिंगगुणोत्तर, साक्षरता दर इ. लोकसंख्याशास्त्रीय घटकांचा अभ्यास केला आहे.

४. **Sinha, S. C. and Singh, B. N.** यांनी "Growth of Population Varanasi City" या संशोधन पेपरमध्ये वाराणसी शहरातील लोकसंख्या वाढीचे अध्ययन केले आहे.

५. **Singh, D. N.** (१९९२) यांनी "Population Growth and Economic Development" या प्रस्तुत लेखामध्ये लोकसंख्या वाढ आणि आर्थिक विकास यातील सहसंबंध दर्शविलेला आहे.

६. **Bhattacharya, Sanghita** (२००४) यांनी "Population Development and Environment: Indian Metropolition Scenario" या लेखात भारतातीला महानगराच्या अनुषंगाने लोकसंख्या विकास आणि पर्यावरण या विषयावर संशोधन केले आहे.

७. **Shukla Prabhati** (२००५) यांनी "Reproduction Behaviour of Population in Sagar District" यामध्ये मध्यप्रदेशातील सागर जिल्ह्यातील जनन विषयक वर्तणुकीचा अभ्यास केलेला आहे.

८. **Prof. Das M. M. and Dr. Dutta L.** (२००६) यांनी "Growth of Population and Food Production in North East India" या लेखात ईशान्य भारतातील लोकसंख्या वाढ आणि अन्नधान्य उत्पादन या विषयी संशोधन केलेले आहे.

**९. डॉ. सिनकर, दि. स.** (२०१०) "अमरावती शहर लोकसंख्याशास्त्रीय वैशिष्ट्यांचे भौगोलिक अध्ययन" यावर अभ्यास केला आहे.

**१०. प्रा. आखरे, प्रा. खराते, प्रा. मुंढे** (२०११) यांनी "वाशिम जिल्ह्यातील लोकसंख्या वाढीमुळे भूमी उपयोगात झालेला बदल भौगोलिक अभ्यास" प्रस्तुत लेखात वाशिम जिल्ह्यातील लोकसंख्या वाढ आणि त्यामुळे झालेला भूमी उपयोगात कालिक बदल याविषयी अध्ययन केलेले आहे.

**११. Saptrashi P., Musmade A., More J.** (२०११) "Geographical Analysis of Sex Ratio in Rahuri Tahasil of Ahamadnagar District (Maharashtra)" यांनी अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी तहसील मधील लोकसंख्येच्या लिंग गुणोत्तराचे अध्ययन केले आहे.

**१२. Ingale Sudhir and Hande Mahadev** (२०१८) यांनी "A Geographical Analysis of Density and Sex Ratio in Kolhapur District (Maharashtra)" या लेखात कोल्हापूर जिल्ह्यातील १९७१-२०११ या काळातील लोकसंख्या घनता व साक्षरता यांचे अध्ययन केले आहे.

**सांख्यिकीय स्त्रोत व संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत संशोधनसाठी १९९१ ते २०११ या कालावधीतील सांख्यिकीय माहिती विचारात घेण्यात येईल. अमरावती शहरातील लोकसंख्या, शास्त्रीय घटक अभ्यासण्यासाठी लागणारी सांख्यिकीय आकडेवारी व माहिती प्रामुख्याने प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांद्वारे प्राप्त केल्या जाईल.

प्रस्तुत संशोधन करण्यासाठी आवश्यक ठरणारी प्राथमिक स्वरूपाची माहिती प्रत्यक्ष अभ्यास क्षेत्राला भेट देऊन संकलित केल्या जाईल. तर द्वितीयक स्वरूपाची माहिती हि अमरावती जिल्हा जनगणना अहवाल पुस्तिका १९९१, २००१, २०११, अमरावती जिल्हा आर्थिक सामाजिक समालोचन १९९१, २००१, २०११, Town and Village Directory, अमरावती महानगरपालिकेद्वारे प्रकाशित अहवाल, शहर नियोजन कार्यालयाद्वारे प्राप्त होणारे मुद्रित साहित्य तसेच विविध शासकीय, निमशासकीय व खाजगी संस्थेद्वारे प्रसिद्ध माहितीच्या आधारे प्राप्त करण्यात येईल.

प्राथमिक व दुय्यम स्त्रोताद्वारे संकलित केलेल्या समांकाचे योग्यपणे सारणीयन व संस्करण करून आवश्यक तेथे नकाशा, आलेख व आकृत्या इत्यादीच्या साहाय्याने सदर माहिती प्रदर्शित करण्यात येईल. अमरावती शहरातील लोकसंख्येची घनता साक्षरता, लिंग गुणोत्तर इत्यादी, विहीत सांख्यिकीय सुत्राचा वापर करून दर्शविण्यात येईल तसेच आवश्यक तेथे योग्य त्या पद्धतीचा उपयोग करून हे संशोधन पूर्ण करण्यात येईल.

**निष्पती. (Outcomes) :**

वरील शोधनिबंधाच्या माध्यमातून अमरावती शहरातील वाढती लोकसंख्या तसेच शहराच्या संरचनात्मक विकासात लोकसंख्या शास्त्रीय गुणवैशिष्ट्याची भूमिका यावर प्रकाश टाकण्यात आलेला असून वाढती लोकसंख्या आणि त्याद्वारे निर्माण होणाऱ्या समस्या सोडविण्यास काही प्रमाणात मदत होईल.

१) प्रस्तुत शोधनिबंध हा अमरावती शहरावर आधारित असल्यामुळे दिवसेंदिवस शहराच्या लोकसंख्येमध्ये वाढ होत असून निवास क्षेत्रावरील जमिनीचे प्रमाण हे वाढत आहे. त्यामुळे या शोध निबंधाच्या माध्यमातून निवासी जागेच्या प्रमाणाचे नियोजन करून त्यावर काही उपाययोजना आखण्यास नक्कीच मदत होईल.

२) अमरावती शहरातील ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमी अभ्यासून शहराचा सांस्कृतिक अभ्यास करून शहरातील लोकांची असलेली सामाजिक स्थिती समजण्यास मदत होईल. त्या आधारे त्यांच्या सामाजिक दर्जा उंचावण्यास मदत करता येईल.

३) अमरावती शहरातील लोकसंख्याशास्त्रीय गुणवैशिष्ट्ये जसे की लोकसंख्या वाढ, वितरण, घनता, वयोरचना, लिंगरचना, जन्ममृत्यू , साक्षरता, व्यवसाय संरचना, धार्मिक संरचना अभ्यासून भविष्यकालीन शहराच्या संरचनेचे नियोजन आखण्यास मदत होईल.

४) अमरावती शहराच्या लोकसंख्या घनता व वितरणातील अभिक्षेत्रीय व कालिक बदल १९९१ - २०११ भविष्यकालीन वाढती लोकसंख्या व लोकसंख्येच्या नियंत्रणासाठी आवश्यक ती उपाययोजना करण्यात येईल.

५) अमरावती शहरातील औद्योगिक क्षेत्राचे वितरण, उद्योगधंद्यांचे वर्गीकरण तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची असलेली भूमिका अभ्यासून शहराच्या औद्योगिक विकास साधण्यासाठी प्रस्तुत अध्ययनाद्वारे मदत होईल.

६) शहरातील वाढती लोकसंख्या व उपलब्ध साधन संपत्ती यांचा अभ्यास करून बेरोजगारीचे प्रमाण कमी करण्यासाठी व उपाययोजना आखण्यासाठी मदत होईल.

७) वाढते शहरीकरण व अपुरी साधन संपत्ती या अनुषंगाने दिवसेंदिवस उद्भवणाऱ्या आर्थिक, सामाजिक, राजकीय समस्या सोडवण्यासाठी प्रस्तुत अध्ययनाची मदत होईल.

८) लोकसंख्या शास्त्रीय गुणवैशिष्ट्याची भूमिका अभ्यासून शहरातील लोकांची आर्थिक स्थिती सुधारण्यास प्रोत्साहन देऊन त्यासाठी विविध उपक्रम राबवण्यास मदत होईल.

**संदर्भग्रंथ सूची**

**पुस्तके (Books)**

१. प्रा. अहिरराव, प्रा. अलिझाड प्रा. धापडे, प्रा. वराड, प्रा. भोस (१९९५) : 'लोकसंख्या भूगोल', निराली प्रकाशन, पुणे

२. प्रा. चंदना आर. सी. (२००५): 'जनसंख्या भूगोल', कल्याण प्रकाशन, लुधियाना

३. डॉ. चतुर्भुज मामोरिया (१९९९): 'आर्थिक भूगोल', साहित्य भवन, पुणे

४. दुबे कमलाकांत, सिंह महेंद्र बहादूर (१९९४) 'जनसंख्या भूगोल' रावत पब्लिकेशन, जयपूर एवं नई दिल्ली.

५. डॉ. गर्ग एच. एस. (१९९५): 'जनसंख्या भूगोल' प्रगती प्रकाशन, मेरठ

६. डॉ. घारपुरे विठ्ठल (१९९७): 'लोकसंख्या भूगोल' पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर

७. प्रा. घोलप एन. टी. (१९९७): 'लोकसंख्या भूगोल' निशिकांत प्रकाशन, पुणे

८. डॉ. हिरालाल (१९८९): 'लोकसंख्या भूगोल' वसुंधरा प्रकाशन, पुणे
९. डॉ. कुलकर्णी एस. एम. (१९९८): 'लोकसंख्या शास्त्र व लोकसंख्या शिक्षण', विद्या प्रकाशन, नागपूर
१०. डॉ. नेगी बी. एस. (१९९५): 'संसाधन भूगोल' एस. जे. प्रकाशन, मेरठ
११. डॉ. सावंत, प्रा. आठवले, प्रा. मुसमाडे (११९२): 'लोकसंख्या भूगोल' मेहता पब्लिशिंग होऊस, पुणे
१२. तिवारी विजयकुमार (११९७): 'भारतका जनसंख्या भूगोल' भाग-१, हिमालय पब्लिशिंग, मुंबई
१३. प्रा. थोरात एस. डी., प्रा. डोईफोडे (२००२): 'मानवी भूगोल' अनिरूद्ध पब्लिशिंग हाऊस, पुणे
14. Agrawal J. C. (2004): 'Population Education', Shipra Publication, 115A, Shakarpur, Vikas marg, Delhi-110092
15. Bhende Asha A. (1193): 'Principles of Population Studies', Himalaya Publishing House, Bombay
16 Shastri P. S. (1973): 'Growth and Distribution of Population in Nagpur City', Nat. Geog, Vol. VIII, P.No. 63-70
17. Ranade Shastri Prabha: 'Population Dynamics in India', Ashish Publishing House, New Delhi.
18. Dr. Sawant S. B. & Prof. Athavale A. s. (1992): 'Population Geography' Mehta Publishing House, Pune

**Journals**

1. Auroussecu M. (1923): 'The Geographical Study of Population Groups' Geographical Review of India, P. 266-282.
2. Bhattacharya Sanghita (2004): 'Population Development and Environment: Indian Metropolition Scenario' Geographical Review of India, Vol. 66 No.4
3. Bidvai B. K. (1951): 'The Variation of Population in Amravati District', Geographical Review of India, Vol. XIII. P.34
4. Chatterjee S. P. (1962): 'Regional Pattern of Desity Distribution of Population in India', Singh D. N. (1992): 'Population Growth and Economics Development' Annuals, Nagi, Vol. XII., No. 1 & 2
5. Singh S. C., Singh B. N.: 'Growth of Population of Varanasi City', Geographical Review of India, Vol.48, No.1
6. Sinha B. N. (1958) : Population Analysis of Orisa', Geographical Review of India, Vol. IV P. 200.

7. प्रा. आखरे, प्रा. खराते, प्रा. मुंढे (२०११): 'वाशिम जिल्ह्यातील लोकसंख्या वाढीमुळे भूमी उपयोगात झालेल्या बदल भौगोलिक अभ्यास' महाराष्ट्र भूगोलशास्त्र संशोधन पत्रिका, खंड-२८, अंक-२

8. डॉ. सिनकर दि. स. (२०१०): 'अमरावती शहर: लोकसंख्या शास्त्रीय वैशिष्ट्यांचे भौगोलिक अध्ययन', PATRON, Vol. I, Issue: IX, नांदेड (महाराष्ट्र)